0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १२/०२/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.११/२०१३/जा.३३१, दिनांक १४/०२/२०१३.

३) ॲड. श्री. पी.आर. हेडगे यांचे मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार श्रीमती जयपाल बसरा तसेच गुरप्रितसिंह बसरा व व्यवस्थापक बाबुलाल बुलाराम विष्णोई यांचे वतीने दि. २५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त संयुक्त निवेदन.

४) ॲड. श्री. पी.आर. हेडगे यांचे मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार श्रीमती जयपाल बसरा तसेच गुरप्रितसिंह बसरा यांचे वतीने दि. २५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त संयुक्त निवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दिंडोशी पोलिस ठाणे यांचे दि. २७/०२/२०१३ रोजीचे अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.११/२०१३/जा. ३३०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २५/०८/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील उपनियंत्रक शिधावाटप व फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह सायंकाळी ०५:०० वाजता मे. गार्गी गॅस सर्विस या गॅस एजन्सीचे कार्यालय पत्ता - १८ अे, प्रतिक बिल्डींग, निवेटिया रोड, मालाड (पू.) येथे तपासणीकरीता पोहचले. अधिकाऱ्यांनी तेथे काऊंटरवर उपस्थित इसमास गॅस एजन्सीचे मालक/व्यवस्थापक विषयी विचारणा केली असता, कॅबिनमध्ये उपस्थित असलेले इसम काऊंटरजवळ आले. अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले. सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव

0002

बाबुलाल बुलाराम विष्णोई, राहणार ६०३, सनराईज बिल्डींग, मलकान इस्टेट, दत्त मंदिर रोड, मालाड (पू.) असे असल्याचे सांगून ते गॅस एजन्सीचे व्यवस्थापक असल्याचे सांगितले.

तद्नतर, अधिकाऱ्यांनी बाबुलाल विष्णाई यांना गॅस एजन्सीचे तपासणी कामी अभिलेख उपलब्ध करुन देण्याचे सांगितले. त्यानुसार बाबुलाल विष्णोई यांनी अभिलेख उपलब्ध करुन दिला. अधिकाऱ्यांनी बाबुलाल बिष्णोई यांना गॅस एजन्सीच्या गोदामाविषयी विचारणा केली असता, त्यांनी गोदामाचे पत्ते पुढीलप्रमाणे असल्याचे सांगितले. गोदाम क्र. (१) बसंरा कंपाऊंड, रोड़ नं. २, ठाकूर व्हिलेज, सिंग इस्टेट, कांदीवली (पू.), गोदाम क्र. (२) निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) व गोदाम क्र. (३) कुरार व्हिलेज, के एच खान चाळ, लक्ष्मणनगर, मालाड (पू.) असे असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी सदर गोदामांचे विस्फोटक परवान्यांविषयी विचारणा केली असता, बाबुलाल विष्णोई यांनी गोदाम क्र. १ बसरा कंपाऊंड, रोड नं.२, ठाकूर व्हिलेज, सिंग इस्टेट, कांदीवली (पू.) या गोदामाचा विस्फोटक परवाना असल्याचे परंतू उर्वरित गोदाम क्र. २ निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) व गोदाम क्र. ३ कुरार व्हिलेज, के एच खान चाळ, लक्ष्मणनगर, मालाड (पू.) या गोदामांचा विस्फोटक परवाना नसल्याचे सांगितले. बाबुलाल बुलाराम विष्णोई यांनी गोदाम क्र. १ बसरा कंपाऊंड, ठाकूर व्हिलेज, रोड नं.२, सिंग इस्टेट, कांदीवली (पू.) या ठिकाणी गॅस सिलेंडरचा साठा करणेकामी सहाय्यक मुख्य नियंत्रक विस्फोटक, मुंबई यांचेकडून प्राप्त परवाना क्र.जी/डब्ल्यूसी/एमएच/०६/२०४/(जी १२३४९) वैधता दिनांक ३०.९.२०१४ सादर केला.

बाबुलाल बुलाराम विष्णोई यांनी गोदाम क्र. २ निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) या ठिकाणावर मोकळया जमिनीवर जाळीचे कुंपण करुन १९७९ पासून सिलेंडरचा साठा देवाण घेवाण करीत असल्याचे सांगितले. सदर जमीन शांतीबेन निवेटीया यांच्या मालकीची असून भाडे तत्वावर ते वापर करतात. सहायक मुख्य विस्फोटक नियंत्रक कार्यालयाचे दिनांक २५.०८.१९७७ चे पत्रानुसार या ठिकाणी मंजूर नकाशाप्रमाणे सिलेंडरचे गोदामाचे बांधकाम करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र जागेची मालकीण यांनी याबाबत परवानगी दिली नसल्याने त्यांना सदर ठिकाणात प्रत्यक्ष गोदामाचे बांधकाम करता येत नाही. मालकाबरोबर जागेचा वाद लघुवाद न्यायालय बांद्रा येथे दावा क्र. २६५०/१९८३ तसेच दावा क्र.१०७१/१९८५ अन्वये सुरु आहे. मालक बांधकामास परवानगी देत नसल्यामुळे नाईलाजास्तव त्यांना निवेटीया कंपाऊंड येथील मोकळया जागेत भरलेले/रिकामे सिलेंडरची साठवणूक करणे भाग पडते. निवेटीया कंपाऊंडला लागून दक्षिण उत्तर दिशेला निवासी बांधकाम आहेत. तसेच सिलेंडर साठयाजवळ किमान ३ आग प्रतिबंधक बाटल्या नेहमी उपलब्ध असतात. तसेच या ठिकाणी कोणताही अपघात होऊ नये म्हणून २४ तास पहारेकरी तैनात केला आहे, असे

अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. बाबुलाल बुलाराम विष्णोई यांनी गोदाम क्र. ३ कुरार व्हिलेज, के एच खान चाळ, लक्ष्मणनगर, मालाड (पू.) येथे गार्गी गॅस सर्विसचे विस्तारित केंद्र असल्याचे सांगितले. या ठिकाणावरुन गॅसची वाहतूक होत असते मात्र ते तेथे कायमस्वरुपी साठवणूक करीत नाही, असेही अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले.

दरम्यान, अधिकाऱ्यांनी गॅस एजन्सीचे गोदामांना भेट देऊन साठा तपासणी केली. कार्यालयातील साठे पुस्तक/संगणकीकृत पुस्तकी साठयाची गोदामातील प्रत्यक्ष शिल्लक साठयाशी पडताळणी केली असता, ती पुढीलप्रमाणे आढळली. घरगुती वापराचे भरलेले गॅस सिलेंडरचा पुस्तकी व प्रत्यक्ष साठा १०९ एवढा असल्याचे तर व्यावसायीक वापराचे भरलेले गॅस सिलेंडरचा पुस्तकी व प्रत्यक्ष साठा ६२ एवढा असल्याचे म्हणजेच तो बरोबर असल्याचे आढळले. तथापी, घरगुती वापराचे रिकामे गॅस सिलेंडरचा पुस्तकी साठा ६५७ तर प्रत्यक्ष साठा ६५३ म्हणजेच ४ सिलेंडर कमी असल्याचे तर व्यावसायीक वापराचे रिकामे गॅस सिलेंडरचा पुस्तकी साठा ६०३ तर प्रत्यक्ष साठा ६११ म्हणजेच ८ सिलेंडर जास्त असल्याचे आढळून आले. याबाबत अधिकाऱ्यांनी बाबुलाल बुलाराम विष्णोई यांचा जबाब नोंदवून घेतला. तसेच अधिकाऱ्यांनी साठे पुस्तकाची तपासणी केली असता, दिनांक १७.१२.२०१३ पासून साठे पुस्तक पेन्सिलने लिहीले असल्याचे आढळून आले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी गॅस एजन्सीची तपासणी पूर्ण करुन घेतली.

मे. गार्गी गॅस सर्विस ही गॅस एजन्सी निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) या कंपाऊंड/गोदामामध्ये विस्फोटक परवान्याशिवाय भरलेले/रिकामे गॅस सिलेंडरची साठवणूक करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने अधिकाऱ्यांनी सदर कंपाऊंडमधील मुद्देमाल जागीच जप्त केला. जप्त मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्देमालांचा तपशिल | साठा / नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १ | घरगुती वापराचे भरलेले सिलेंडर | १०६ | २,००,१२८/- |
| २ | घरगुती वापराचे रिकामे सिलेंडर | ३६६ | ५,३०,७००/- |
| ३ | व्यासायीक वापराचे भरलेले सिलेंडर | ५४ | १,८०,६५७/- |
| ४ | व्यासायीक वापराचे रिकामे सिलेंडर | १०० | १,७०,०००/- |
| ५ | सिलेंडर साठवणूक केलेला भंगार ट्रक | १ | २,५०,०००/- |
| ६ | वजन कोटा (लोखंडी) | १ | ३,०००/- |
| ७ | प्लॉस्टीक ट्रॉली (सिलेंडर ठेवणेसाठी) | ५० | १२,५००/- |
| ८ | गॅस शेगडी | १५ | ३६,०००/- |
| ९ | आग प्रतिबंधक बाटला (मोठे) | १ | ३,०००/- |
| १० | आग प्रतिबंधक बाटला (छोटे) | १ | १,५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | रेग्युलेटर | २५ | ६,२५०/- |
| १२ | ५ कि.ग्रॅ. रिकामे सिलेंडर | १६ | ५,६००/- |
| एकूण अंदाजे किंमत | | | १३,९९,३३५/- |

दरम्यान, अधिकाऱ्यांनी दिंडोशी पोलीस स्टेशन येथे संपर्क साधला. त्यानुसार सदर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार श्री. अधिकराव बाबुराव शिंदे, बक्कल नंबर ११७९५ हे घटनास्थळी उपस्थित झाले. अधिकाऱ्यांनी त्यांना घटनेची सविस्तर माहिती दिली. तद्नतर मे. गार्गी गॅस सर्विस, निवेटीया कंपांड, निवेटीया रोड येथील विस्फोटक परवान्याशिवाय असलेले गोदाम सिलबंद करण्याची माहिती देऊन त्या ठिकाणात उपस्थित अधिकारी व पोलीस कर्मचारी पंचासमक्ष पोहचले. सिलबंद करावयाच्या कंपाऊंडमधील मुद्देमालाचा पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सविस्तर पाहणी करण्यात आली. गॅस सिलेंडर विस्फोटक पदार्थ असल्याने कोणताही घातपात होऊ नये या दृष्टीने योग्य ती सुरक्षा राखणेकामी उपस्थित पोलीसास समजावून सांगण्यात आले. सदर पाहणीनंतर सर्व अधिकारी कर्मचारी गेटमधून बाहेर आले व पंचासमक्ष गेट कुलूपबंद करुन सिलबंद करण्यात आले व त्याची किल्ली उपस्थित पोलीसांकडे सुपूर्द करण्यात आली.

अशाप्रकारे, मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार व व्यवस्थापक हे विस्फोटक परवान्याशिवाय बेकायदेशीररित्या निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) येथे भरलेले/रिकामे सिलेंडरची साठवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी तपासणीत निष्पन्न झाल्याने त्यांनी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले आहे. पर्यायानी त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ४ (अे) (सी) (एफ) व कलम १० (अे) चा भंग केल्यावरुन दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १०/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २७/०२/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. पी.आर. हेगडे यांनी मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार श्रीमती जयपाल बसरा, भागीदार गुरप्रितसिंह बसरा व व्यवस्थापक बाबुलाल बुलाराम विष्णोई यांच्या वतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये यापुर्वी टपालामार्फत लेखी निवेदन सादर केले तसेच सदर सुनावणीसही श्रीमती जयपाल बसरा, भागीदार गुरप्रितसिंह बसरा यांचेवतीने वाचावे क्र. ४ अन्वये संयुक्त लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार गुरप्रितसिंह बसरा हे उपस्थित राहिले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. टी. एस. खाडे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सुनावणीच्या वेळी उपस्थित मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार गुरप्रितसिंह बसरा यांनी घटनास्थळी मोकळ्या मैदानात सिलेंडरचे साठवणूक केल्याचे सांगून सदर ठिकाणी विस्फोटक परवाना इ. कागदपत्रांची पुर्तता न केल्याचे तसेच संबंधीत तेल कंपनीकडून परवानगी घेतली नसल्याचे मान्य केले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

ॲड. श्री पी.आर. हेडगे यांचे मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार श्रीमती जयपाल बसरा, गुरप्रितसिंह बसरा व व्यवस्थापक बाबुलाल बुलाराम विष्णोई यांचे वतीने प्राप्त संयुक्त निवेदनात, ते मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार म्हणुन शॉप नं. १८/अे, मालाड प्रतिक बिल्डींग, निवेटीया रोड, मालाड (पुर्व), मुंबई-४०० ०९७ या पत्त्यावर घरगुती तसेच व्यावसायिक वापराच्या एल.पी.जी. सिलेंडर वितरणाचे मागील ३८ वर्षापासुन व्यवसाय करीत आहेत. एजन्सीजवळ मोकळ्या जागेत गॅस सिलेंडरचे साठवणूक करुन वितरण करीत आहेत. सदर मोकळ्या परिसराशेजारी श्रीमती शांतीबेन निवेटीया व त्यांचे जावई श्री प्रेम केशवानी यांचा बंगला असुन ते नेहमीच खोटी तक्रार करीत आहेत. तसेच श्रीमती शांतीबेन निवेटीया यांनी त्यांचे एजन्सीच्या विरुद्ध वांद्रें, मुंबई येथील न्यायालयामध्ये क्रमांक २६५०/८३ अन्वये खोटी केस दाखल केली असुन ती आजमितीस प्रलंबित आहे. दिनांक ०५/०२/२०१३ व ०६/०२/२०१३ रोजीच्या तपासणीमध्ये आपल्या पथकास त्यांनी योग्यते सहकार्य केले आहे. सदर तपासणीनंतर पथकाने मोकळ्या जागेत प्रवेश करुन तेथील मुद्देमाल सिल केला आहे. दिनांक २५/०८/१९७७ रोजी विस्फोटक विभाग, नागपूर यांचेकडून परवानगी प्राप्त झाली होती. परंतु श्रीमती शांतीबेन निवेटीया या जागा मालकाने त्यांना ना-हरकत पत्र देण्याचे नाकारले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कलम ३९४अे अन्वये नोटीस निर्गमित केली असुन त्याअनुषंगाने मा. न्यायालय येथे सुट क्र. २०७४/१९८० अन्वये युक्तीवाद झाला आहे. तद्नंतर बृहन्मुंबई

महानगरपालिका यांनी क्र. डब्ल्युओपी/एन/१२४३/एल दिनांक १९/०३/१९८० अन्वये जप्तीनामा निर्गमित केला आहे. दिनांक १४/०२/२०१३ रोजी निर्गमित केलेले कारणे दाखवा नोटीस हे नियमबाह्य असुन त्यांनी सदर व्यवसाय करताना आवश्यकत्या उपाययोजना केलेल्या आहेत. सदर नोटीसमध्ये जप्त मुद्देमालाची किंमत १३,९९,३३५/- दर्शविली असुन सदरची किंमत चुकीची असुन खऱ्या अर्थाने जप्त मुद्देमालाची किंमत रुपये ४,३९,६२५.५०/- असुन सदरचा जप्त सिलेंडरचा साठा हा हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपनीचा आहे. सदरचा साठा जप्त केल्यास त्यांच्या दैनिक व्यवहारामध्ये बाधा येवुन त्यांचे नुकसान होईल. सदरचा सिलेंडरचा साठा मोकळ्या जागेत ठेवताना त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यकत्या उपाययोजना केल्या असुन तो साठा तें ट्रकमध्ये ठेवुन सदर मोकळ्या परिसरात चोवीस तास वॉचमनचा पहारा ठेवण्यात आलेला आहे. तसेच अग्नी प्रतिबंधक नळकांडीही ठेवण्यात आली आहे. तपासणीचेवेळी पथकाने भरलेले सिलेंडर काढुन मोजदाद करीता जमिनीवर ठेवले आहेत. सादर केलेल्या निवदेनाची मा. प्राधिकरण यांनी अवलोकन केल्यास त्यांचा सदर प्रकरणी कोणताही गुन्हा नसुन त्यांचेवर चुकीची कारवाई करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी त्यांचा नफोखोरी अथवा गैरहेतु नसल्याचे दिसुन येईल. सदर प्रकरणी मा. न्यायालय यांनी त्यांना व त्यांचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यास अटकपुर्व जामिन मंजुर केले आहे. जप्त सिलेंडरमधील गॅसचा साठा हा अति ज्वलनशील असुन त्यास योग्यरित्या हाताळणे गरजेचे असुन तसे न केल्यास अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे. सदर सिलेंडरच्या साठ्याचे ते मालक असुन तो जप्त असल्याने सामान्य जनतेस त्याचा त्रास होत आहे. जप्त मुद्देमाल योग्यत्या अटी व शर्तीवर मुक्त करुन घेण्यासाठी आपल्या कार्यालयाशिवाय इतर कोणताही पर्याय उपलब्ध नाही. प्रचलित नियमानुसार ते व्यवसाय करीत असुन त्याकरीता विस्फोटक विभागाकडून त्यांचेकडे पत्र प्राप्त आहे. त्यामुळे त्यांचा मोकळ्या परिसरातील जप्त करण्यात आलेला सिलेंडरचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन, तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित दिंडोशी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री टी. एस. खाडे यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे अभिवेदनात, नमुद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी १) श्रीमती जसपाल बलहारसिंग बसरा, २) गुरप्रितसिंग बलहारसिंग बसरा, ३) बाबुलाल बुलाराम बिष्णोई यांनी मा. १२ वे सत्र न्यायालय, दिंडोशी येथे अटकपुर्व जामीन मिळणेकरीता अर्ज केल्याने सदर अर्जाची सुनावणी दिनांक १२/०२/२०१३ रोजी होऊन मा. न्यायालयाने पाहिजे आरोपीतांना प्रत्येकी १५,०००/- रुपयाचा लायक जामीन मंजूर केला आहे. सदर पाहिजे आरोपी हे दि.१५/०२/२०१३ रोजी पोलिस ठाणेस स्वतःहून हजर झाल्याने त्यांचेकडे गुन्ह्यासंबंधाने विचारणा करुन, त्यांना मा. सत्र न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रत्येकी १५,०००/- च्या लायक जामीनावर मुक्त करण्यात आले आहे. गार्गी गॅस एजन्सीचे मालक

१) श्रीमती जसपाल बलहारसिंग बसरा, २) गुरप्रितसिंग बलहारसिंग बसरा यांनी वर नमुद गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल ताब्यात देण्यात यावा किंवा कसे ? याबाबत आपणाकडून पोलिसांचा अभिप्राय सादर करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. बेकायदेशिर गॅसचा साठवणूक केलेले गोदामापासून २० फुट अंतरावर रहिवाशी लोकवस्ती आहे. त्यामुळे भविष्यात गोदामातील गॅसचा स्फोट/गळती झाल्यास मोठ्या प्रमाणात जिवीत/वित्त हानी होण्याची दाट शक्यता आहे. बेकायदेशीर गॅसचा साठवणूक केलेले गोदामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची अपुरी साधने आहेत. बेकायदेशीर गॅसचा साठवणूक केलेले गोदाम हे असुरक्षित आहे. तसेच काही गॅस सिलेंडर हे उघड्यावर ठेवले जात आहेत तसेच त्या ठिकाणी आवश्यक असलेला पुरेसा कर्मचाऱ्यांची नियुक्ती दिसून येत नाही. गॅस एजन्सी मालकास जप्त मुद्देमाल पुन्हा ताब्यात दिल्यास त्यास कायद्याची भिती राहणार नाही. तसेच तो भविष्यात अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे. जप्त मुद्देमाल हा आपल्या कार्यालयामार्फतीने रितसर ताब्यात घेऊन त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही आपले मार्फतीने लवकरात लवकर करण्याव यावी, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील उपनियंत्रक शिधावाटप व फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार व व्यवस्थापक हे विस्फोटक परवान्याशिवाय बेकायदेशीररित्या निवेटीया कंपाऊंड, निवेटिया रोड, मालाड (पू.) येथे भरलेले/रिकामे सिलेंडरची साठवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी तपासणीत निष्पन्न झाल्याने त्यांनी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले आहे. पर्यायानी त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ४ (अे) (सी) (एफ) व कलम १० (अे) चा भंग केल्यावरुन दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १०/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकुण रुपये १३,९९,३३५/- एवढ्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी पथकाने घटनास्थळी असलेल्या मोकळ्या परिसरात सिलेंडर साठवणूक करण्या करीता वापरात असलेला भंगार ट्रक जप्त केला आहे. नैसर्गिक न्याय म्हणून या कार्यालयाच्या वतीने सदर भंगार ट्रकच्या मालकास त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत

अथवा खुलासा सादर केलेला नाही. यावरुन प्रस्तुत प्रकरणी सदर जप्त भंगार ट्रकचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येत आहे. सदर भंगार ट्रकचे मालक यांनी मे. गार्गी गॅस सर्विसचे मालक/भागीदार यांच्याशी संगनमत करुन संदर ट्रकचा संबंधितांनी शासन नियंत्रित दराचे सिलेंडरचा अवैध साठवणुकीसाठी अनधिकृतपणे वापर केला असल्याचे सिध्द होत असल्याने या प्रकरणी ट्रकमालकाचाही सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार संदरचा जप्त करण्यात आलेला भंगार ट्रक हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास भंगार ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा भंगार ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा भंगार ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या भंगार ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी भंगार ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार गुरप्रितसिंह बसरा यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार म्हणुन शॉप नं. १८/अे, मालाड प्रतिक बिल्डींग, निवेटीया रोड, मालाड (पुर्व), मुंबई-४०० ०९७ या पत्त्यावर घरगुती तसेच व्यावसायिक वापराच्या एल.पी.जी. सिलेंडर वितरणाचे मागील ३ वर्षापासुन व्यवसाय करीत असुन एजन्सीजवळ मोकळ्या जागेत गॅस सिलेंडरचे साठवणूक करीत असल्याचे सांगितले. सदर मोकळ्या परिसराशेजारी श्रीमती शांतीबेन निवेटीया व त्यांचे जावई श्री प्रेम केशवानी यांचा बंगला असुन ते नेहमीच खोटी तक्रार करीत आहेत. सदर तपासणीच्या वेळी पथकाने मोकळ्या जागेतील सिलेंडरचा साठा जप्त केला आहे. दिनांक २५/०८/१९७७ रोजी विस्फोटक विभाग, नागपूर यांचेकडून परवानगी प्राप्त झाली होती. परंतु श्रीमती शांतीबेन निवेटीया या जागा मालकाने त्यांना ना-हरकत पत्र देण्याचे नाकारले आहे. सदरचा साठा जप्त केल्यास त्यांच्या दैनिक व्यवहारामध्ये बाधा येवुन त्यांचे नुकसान होईल. सदरचा सिलेंडरचा साठा मोकळ्या जागेत ठेवताना त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यकत्या उपाययोजना केल्या असुन तो साठा ते ट्रकमध्ये ठेवुन सदर मोकळ्या परिसरात चोवीस तास वॉचमनचा पहारा ठेवण्यात आल्याचे सांगितले.

CONTROLLER OF RATIONING HEAD OFFICE MUMBAI

तथापी, दिंडोशी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री टी. एस. खाडे यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, मे. गार्गी गॅस सर्विस यांनी बेकायदेशिर गॅसचा साठवणूक केलेल्या जागेपासुन २० फुट अंतरावर रहिवाशी लोकवस्ती आहे. त्यामुळे भविष्यात गोदामातील गॅसचा स्फोट/गळती झाल्यास मोठ्या प्रमाणात जिवीत/वित्त हानी होण्याची दाट शक्यता असुन बेकायदेशीर गॅसचा साठवणूक केलेले

गोदामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची अपुरी साधने आहेत. बेकायदेशीर गॅसचा साठवणूक केलेले गोदाम हे असुरक्षित आहे. तसेच काही गॅस सिलेंडर हे उघड्यावर ठेवले जात आहेत तसेच त्या ठिकाणी आवश्यक असलेला पुरेसा कर्मचाऱ्यांची नियुक्ती दिसून येत नाही. गॅस एजन्सी मालकास जप्त मुद्देमाल पुन्हा ताब्यात दिल्यास त्यास कायद्याची भिती राहणार नाही. तसेच तो भविष्यात अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे. जप्त मुद्देमाल हा आपल्या कार्यालयामार्फतीने रितसर ताब्यात घेऊन त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही आपले मार्फतीने लवकरात लवकर करण्याव यावी, असे सांगितले.

मे. गार्गी गॅस सर्विस येथे तपासणी करताना पथकास आढळुन आले की, सदर एजन्सीमधील संबंधित तेल कंपनीकडून प्राप्त होत असलेला घरगुती तसेच व्यवसायिक वापराचा गॅस सिलेंडरचा साठा ते एजन्सी जवळील मोकळ्या मैदानात सन १९७९ पासुन साठवणूक करीत असल्याचे आढळुन आले आहे. सदरच्या मोकळ्या जागेबाबत त्यांचा जागामालकासोबत वाद असल्याचे निमित्त करुन सदर जागेवर त्यांचा ताबा रहावा अथवा जागेवर अतिक्रमण होवु नये या हेतुने ते मागील ३३ वर्षापासुन सदरच्या मोकळ्या जागेत अतिज्वलनशिल असलेल्या सिलेंडरची विनापरवानगी साठवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सरकारी तेल कंपनीच्या प्रचलित नियमानुसार संबंधित गॅस एजन्सीने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन त्यांच्या ताब्यातील गॅस सिलेंडरचा साठा हा कंपनीकडून मान्यता प्राप्त असलेल्या गोदामात साठवणूक करणे बंधनकारक आहे. गॅस एजन्सीकडे स्वत:चे गोदाम नसल्यास संबंधित तेल कंपनीकडून त्या विभागातील इतर गॅस एजन्सीकडे असलेल्या गोदामात संयुक्त वापर करण्याची परवानगी देण्यात येते अथवा कंपनीच्या ताब्यात असलेल्या माहुल येथील कॉमन वेअरहाऊसमध्ये साठवणूकीस परवानगी दिली जाते. तथापी, सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. गार्गी गॅस सर्विस यांनी साठवणूक केलेला सिलेंडरचा साठा हा मोकळ्या जागेत असल्याचे तसेच आजुबाजूस लोकवस्ती असल्याचे माहित असुनसुद्धा संबंधित तेल कंपनीच्या विभागीय विक्री अधिकारी यांनी सदर ठिकाणी होत असलेल्या सिलेंडरच्या अवैध साठवणूकीची दखल न घेवुन मानवीय जिवीतास धोका निर्माण करुन त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसुर केल्याचे दिसुन येते ही बाब अत्यंत गंभीर आहे.

मे. गार्गी गॅस सर्विस यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या सरकारी तेल कंपनी सोबत घरगुती व व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या पुरवठ्याकरीता वितरक म्हणून ते करारबद्ध आहेत. सदर करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या विविध अटी व शर्तींचे पालन करणे त्यांना बंधनकारक आहे. करारनाम्यामधील अट क्र. १५ मध्ये संबंधित वितरकाने त्याच्याकडील भरलेले व रिकामे सिलेंडरच्या साठवणूकीकरीता स्वखर्चावर गोदाम ठेवणे बंधनकारक असल्याचे नमूद आहे. तसेच विस्फोटक

विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. एलपीजी(७)२६२, नागपूर यांनी दिनांक २५/०८/१९७७ अन्वये मे. गार्गी गॅस सर्विस यांना निर्गमित केलेल्या पत्रामध्ये त्यांनी नमूद मोकळ्या जागेत गोदामाचे बांधकामास सादर केलेल्या नकाशानुसार मान्यता दिल्याचे नमूद आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, पी वॉर्डचे विभाग अधिकारी यांनी दिनांक १९/०३/१९८० रोजी कलम ३९४(४) अन्वये निर्गमित केलल्या जप्तीच्या नोटीसीमध्ये त्यांनी सदरच्या मोकळ्या परिसरात सिलेंडरची साठवणूक करण्यास मनाई केली असुन, तसे केल्यास आजुबाजूच्या परिसरातील जनतेच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने नोटीस प्राप्त झाल्यापासुन ४८ तासाच्या आत साठवणूक केलेला सिलेंडरचा साठा न हलविल्यास नमूद कलमाचे भंग केल्यावरुन सिलेंडरचा साठा जप्त करण्याची बाब नमूद आहे. उपरोक्त अभिलेखावरील कागदपत्रे व विवेचन विचारात घेता मे. गार्गी गॅस सर्विसचे मालक/भागीदार यांना नमूद मोकळ्या जागेत उघड्यावर धोकादायकरीत्या सिलेंडरचे साठवणूक करण्यास इतर प्राधिकरणाकडून मनाई केली जात असतानाही त्यांनी सर्व नियम धाब्यावर बसवुन अत्यंत बेजबाबदारपणे परिसरातील जनसामान्यांच्या जिवीतास धोका निर्माण करुन सिलेंडरची अवैध साठवणूक केल्याचे सिद्ध होत आहे.

तथापी, सदर गुन्ह्यात जप्त केलेले गॅस सिलेंडर परत मिळण्याबाबत तसेच मालकी हक्काबाबत मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार गुरप्रितसिंह बसरा यांनी दावा केला असला, तरी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर्स हे त्यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न होत नाही व त्याबाबत त्यांनी जप्त केलेल्या गॅस सिलेंडर्सबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे अथवा पुरावे सादर केले नसल्याने सदरचे गॅस सिलेंडर त्यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे खरेदी केले असल्याचे दिसून येते. यावरुन सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गॅस सिलेंडरचा साठा हा अवैध व अनधिकृत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला व्यावसायीक व घरगुती वापरातील संपूर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यांच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजी या कार्यालयास सादर केलेल्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, शासनजमा केलेला गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे

शक्य नसल्याने सदरचा जप्त गॅस सिलेंडरचा साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे मदतीने संबंधित तेल कंपनी यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेला एक लोखंडी वजन काटा, ५० प्लास्टिक ट्रॉली, १५ गॅस शेगडी, एक मोठा आग प्रतिबंधक बाटला, एक लहान आग प्रतिबंधक बाटला व २५ रेग्युलेटर इ. पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १०/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेले घरगुती वापराचे भरलेले १०६ व रिकामे ३६६ सिलेंडर तसेच व्यावसायिक वापराचे भरलेले ५४ व रिकामे १०० सिलेंडर व एक रिकामा ५ कि.ग्रॅ. वजनाचा सिलेंडरचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या संपुर्ण घरगुती व व्यावसायीक वापराच्या गॅस सिलेंडर्सचा साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, धी डिमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे मदतीने मे. एच.पी.सी.एल. या तेल कंपनीस बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेला भंगार ट्रक हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनाचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले एक-लोखंडी वजन काटा, ५० प्लास्टिक ट्रॉली, १५ गॅस शेगडी, एक मोठा आग प्रतिबंधक बाटला, एक लहान आग प्रतिबंधक बाटला व २५ रेग्युलेटर इ. पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार श्रीमती जयपाल बसरा
२) मे. गार्गी गॅस सर्विसचे भागीदार गुरप्रितसिंह बसरा
३) मे. गार्गी गॅस सर्विसचे व्यवस्थापक बाबुलाल बुलाराम विष्णोई
४) सिलेंडर साठवणूक केलेला भंगार ट्रकचे मालक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दिडोंशी पोलीस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दिडोंशी पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. तसेच मे. गार्गी गॅस सर्विस यांचेविरुध्द एम.डी.जी. (मार्केटिंग डिसिप्लीनरी गाईडलाईन्स) अंतर्गत कारवाई करण्यासाठी.
३) विभागीय व्यवस्थापक, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.